
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ३० एप्रिल २०२५

आतील पानावर

पान २– 'लॉगआउट'मध्ये बाबिल खान
पान ३ – या अभिनेत्याने खाल्ल्या तब्बल ...
पान ४ – समांथाच्या आयुष्यात पुन्हा प्रेमाची एन्ट्री?
पान ५ – गश्मीर महाजनी 'या' सिनेमाच्या दुसऱ्या ...
पान ६ – यामी गौतम आणि इमरान हाश्मी एकत्र



# 'नागझिला'त दिसणार कार्तिक आर्यन

करण जोहरने त्याच्या आगामी सिनेमाची घोषणा केली आहे. 'नागझिला' असं या सिनेमाचं नाव आहे. या सिनेमाच्या माध्यमातून करण पहिल्यांदाच प्रेक्षकांना सापांच्या अनोख्या दुनियेची सफर घडवणार आहे. या चित्रपटात मुख्य भूमिकेत बॉलीवूडचा लोकप्रिय अभिनेता दिसणार आहे. 'नागझिला' सिनेमाचं मोशन पोस्टर रिलीज झालं असून बॉलीवूड अभिनेता कार्तिक आर्यन या सिनेमात झळकणार आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, 'नागझिला' सिनेमात कार्तिक दुहेरी भूमिकेत झळकणार आहे. या पोस्टरमध्ये कार्तिकने निळी जीन्स घातलेली असून तो शर्टलेस पाठमोरा उभा असल्याचे दिसत आहे. त्याच्या आजूबाजूला फक्त सापच साप आहेत आणि त्यांच्या अंगावरही साप गुंडाळलेले दिसत आहेत. याशिवाय या व्हिडिओ पोस्टरमध्ये कार्तिक आर्यनचा व्हॉइस ओव्हर ऐकू येतो. ज्यात तो म्हणतो, इच्छाधारी नाग, रूप बदलण्याची शक्ती असलेले साप, जसे की मी प्रियमवदेश्वर प्यारे चंद, वय ६३१ वर्षे. माणसांच्या पिक्चर तर खूप पाहिल्या, आता पाहा नागांच्या पिक्चर. यात करणने चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही जाहीर केली आहे. कार्तिक आर्यनचा 'नागजिला' हा चित्रपट नागपंचमीच्या मुहूर्तावर १४ ऑगस्ट २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. 'नागझिला' या चित्रपटाचे शूटिंग सप्टेंबर २०२५ मध्ये सुरू होणार आहे. हा चित्रपट साप आणि माणसाच्या संघर्षावर आधारित विनोदी कथा आहे, ज्यात कार्तिक आर्यन दोन परस्परविरोधी व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन मृगदीप सिंग लांबा करत असून या सिनेमाची निर्मिती करण जोहर आणि महावीर जैन यांनी केली आहे.

# 'दबंग गर्ल' सोनाक्षी सिन्हाच्या नव्या सिनेमाची चर्चा

बॉलीवुडची 'दबंग गर्ल' म्हणून अभिनेत्री सोनाक्षी सिन्हाला ओळखलं जातं. 'राऊडी राठोड', 'दबंग', 'सन ऑफ सरदार' यांसारख्या सुपरहिट सिनेमांमध्ये तिने काम केलं आहे. आपल्या सहजसुंदर अभिनयाने तिने चाहत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. आता लवकरच ती नव्या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. निकीता रॉय असं तिच्या या आगामी चित्रपटाचं नाव आहे. नुकतंच या चित्रपटाचं पहिलं पोस्टर रिलीज करण्यात आलंय. या पोस्टरमधील अभिनेत्रीचा लूक पाहून चाहत्यांच्या मनात चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे. नुकतीच सोनाक्षी सिन्हाने आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टद्वारे अभिनेत्रीने नव्या चित्रपटाची घोषणा केल्याची पाहायला मिळतेय. या साइकोलॉजिकल थ्रिलर सिनेमात सोनाक्षी सिन्हासह अभिनेते परेश रावल आणि अर्जुन रामपाल, सुहैल नय्यर देखील प्रमुख भूमिकेत आहेत. चित्रपटाच्या पोस्टरमध्ये सर्व पात्रे सस्पेन्स लूकमध्ये दिसत आहेत. दरम्यान, या चित्रपटात सोनाक्षीचा कधीही न पाहिलेला अंदाज पाहायला मिळणार आहे. कुश एस सिन्हा यांनी 'निकिता रॉय' हा चित्रपट दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे.शिवाय या चित्रपटाची निर्मिती निक्की खेमचंद भगनानी, किंजल आहूजा घोन आणि विकी भगनानी यांनी केली आहे. हा चित्रपट ३० मे रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.



# 'लॉगआउट'मध्ये बाबिल खान

कला आणि द रेल्वेमॅन यासारख्या चित्रपटांमध्ये स्वत:च्या अभिनयाची जादू दाखविणारा बाबिल खान आता 'लॉगआउट' या चित्रपटात दिसून येत आहे. याचा ट्रेलर सादर करण्यात आल्यापासून लोकांना उत्सुकता होती. हा एक थ्रिलर मिस्ट्री धाटणीचा चित्रपट असून यात ॲक्शन, टेन्शन, ड्रामा आणि सस्पेंससमवेत अनेक ट्विस्ट दिसून येत आहे. लॉगआउट या चित्रपटात दिवंगत अभिनेता इरफानचा पुत्र बाबिल खानसोबत रसिका दुग्गल, निमिशा नायर आणि गंधर्व दीवान हे कलाकार मुख्य भूमिकेत दिसत आहेत.

लॉगआउटची कहाणी २६ वर्षीय सोशल मीडिया इन्फ्लुएंसर प्रत्युषची आहे. ही व्यक्तिरेखा बाबिलने साकारली आहे. त्याचे १० दशलक्ष फॉलोअर्स होण्यापूर्वीच त्याच्या आयुष्याला एक नकोसे वळण मिळते. एका चाहत्याचा हट्ट त्याला एका धोकादायक खेळात लोटतो, यामुळे त्याचे पूर्ण जीवन उद्ध्वस्त होते. एकेदिवशी त्याचा मोबाइल हरवतो आणि मग त्याच्या आयुष्याला मोठमोठे धक्के बसू लागतात असे यात दाखविण्यात आले आहे. डिजिटल माध्यमावर निर्भरतेमुळे निर्माण झालेल्या समस्येला स्पर्श करणारा हा चित्रपट आहे. चित्रपटाला रसिकांची पसंती मिळाली आहे. बाबिलचा हा चित्रपट १८ एप्रिल रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म झी ५ वर प्रदर्शित झाला आहे.




# 'दायरा'त झळकणार करीना कपूर

बॉलिवूडमध्ये एक नवी जोडी प्रेक्षकांसमोर येण्यास सज्ज झाली आहे. करीना कपूर खान आणि पृथ्वीराज सुकुमारन लवकरच मेघना गुलजार यांच्या 'दायरा' चित्रपटात दिसणार आहेत. 'राझी' आणि 'तलवार' सारखे संस्मरणीय चित्रपट देणारी मेघना आता जंगली पिक्चर्ससोबत तिसऱ्यांदा चित्रपट बनवणार आहे. 'दयारा' हा एक गुन्हेगारी नाटक आहे. चित्रपटाच्या घोषणेनंतर चाहत्यांमध्ये उत्साहाची लाट पसरली आहे. करीनाने सोशल मीडियावर या चित्रपटाची घोषणा केली. तिने लिहिले, मी नेहमीच दिग्दर्शकाच्या दिग्दर्शनानुसार काम करणारी अभिनेत्री राहिलो आहे. यावेळी मेघनासारख्या हुशार दिग्दर्शकासोबत काम करणे माझ्यासाठी खास आहे. मी पृथ्वीराजच्या अभिनयाची चाहती आहे. त्याच्यासोबतचा हा प्रवास अधिक रोमांचक असेल. 'दायरा' हा माझ्या ड्रीम टीमचा प्रोजेक्ट आहे. चला तो खास बनवूया... 'दायरा'ची कथा मेघना गुलजार, यश केसवानी आणि सीमा अग्रवाल यांनी संयुक्तपणे लिहिली आहे. हा चित्रपट अजूनही सुरुवातीच्या टप्प्यात आहे, परंतु त्याची स्टारकास्ट आणि मेघनाचे नाव यामुळे तो आधीच चर्चेत आला आहे. करीनाची स्पष्टवक्ती शैली आणि पृथ्वीराजचा गंभीर अभिनय या चित्रपटाला खास बनवण्याची क्षमता ठेवतो. मेघनाचे चित्रपट नेहमीच हृदयाला स्पर्श करतात आणि चाहत्यांना 'दायरा' कडून अपेक्षा असतात.



# 'या' अभिनेत्याने खाल्ल्या तब्बल ६४ चपात्या



तुम्ही समजा एका हॉटेलमध्ये गेलात आणि तिथे अनलिमिटेड फूडची ऑफर वाचली तर तुमची भूक नकळत आणखी वाढते. त्यामुळे तुम्ही त्या हॉटेलमधील जेवणावर मनसोक्त ताव मारता. पण तुम्ही जास्तीत जास्त किती खाल? हा किस्सा एका बॉलिवूड अभिनेत्याचा. जेव्हा अनलिमिटेडची ऑफर बघताच या अभिनेत्याने एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल ६४ चपात्या खाल्ल्या. कोण होता हा अभिनेता? वाचा हा धमाल किस्सा...

हा किस्सा घडला होता अभिनेता जॉन अब्राहमसोबत. २०२२ मध्ये जॉन आपल्या 'अटॅक: पार्ट १' चित्रपटाच्या प्रमोशनसाठी कपिल शर्मा शोच्या दुसर्‍या सिझनमध्ये आला होता. यावेळी त्याने कॉलेजमध्ये असताना त्याच्या खाण्याच्या सवयी कशा होता त्याविषयी एक मजेशीर आठवण सांगितली. झालं असं की, एका फुटबॉल सामन्यानंतर गुजराती थाळी रेस्टॉरंटमध्ये जॉन जेवायला गेला होता. त्या हॉटेलमध्ये अनलिमिटेड जेवण दिले जाते. त्यावेळी जॉनने तब्बल ६४ चपात्या खाल्ल्या. चपात्या आकाराने छोट्या असल्याने जॉनने एकामागून एक पटापट चपात्या संपवल्या. जॉनला असं खाताना बघून वेटरही हैराण झाला. तो जॉनला म्हणाला, अजून भातही आहे, तोही घ्या! हे ऐकताच जॉनने नंतर भातही खाल्ला. अशाप्रकारे अनलिमिटेड ऑफरचा जॉनने मनसोक्त फायदा घेतला. जॉन अब्राहमच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं तर, २०२५ मध्ये जॉनची भूमिका असलेला 'द डिप्लोमॅट' हा सिनेमा थिएटरमध्ये रिलीज झाला. या सिनेमाला प्रेक्षकांचा संमीश्र प्रतिसाद मिळाला. याशिवाय जॉन सध्या पोलीस अधिकारी राकेश मारिया यांच्या आयुष्यावरील आगामी बायोपिक सिनेमात अभिनय करत आहे. रोहित शेट्टी या बायोपिकचं दिग्दर्शन करत आहे.

# 'जाट-२'ची चर्चा सुरू




अभिनेता अभिनेता सनी देओल आणि रणदिप हुडा यांची मुख्य भूमिका असलेला जाट चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. रिलीजच्या आठवड्याभरात जाटने ५० कोटींहून अधिकची कमाई केली आहे. सनी देओलची ॲक्शन प्रेक्षकांना चित्रपट पाहण्यासाठी थिएटरमध्ये खेचून आणत आहे. याशिवाय खलनालयकाच्या भूमिकेत असलेल्या रणदीपला पाहण्यासाठी देखील प्रेक्षक थिएटरमध्ये जात आहेत. यातच आता जाट २ ची चर्चा सुरू झाली असून, खुद्द सनी देओलने याविषयी माहिती देत जाट २ ची अनाउन्समेंट केली आहे. जाट २ चे एक पोस्टर शेअर करत पुढच्या भागाची घोषणा त्याने केली आहे. ही पोस्ट सनीने त्याच्या एक्स अकाउटवरुन शेअर केली असून पोस्टरच्या कॅप्शनमध्ये जॅट ऑन न्यू मिशल असे लिहिले आहे. यामुळे आठवड्याभरापूर्वीच रिलीज झालेला जाट चित्रपट अजून थिएटर्समध्ये सुरू असताना चित्रपटाच्या दुसऱ्या भागाची घोषणा करण्यात आली आहे. जाटमधून पहिल्यांदाच सनी देओल आणि रणदीप हुडा यांनी एकमेकांसोबत स्क्रीन शेअर केली आहे. यामुळे दोघांच्या अभिनयाला आणि चित्रपटाला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. मात्र, काही कारणामुळे चित्रपट वादाच्या भोवऱ्यात सापडला होता. चित्रपटातील एका सीनमुळे मोठा वादंग निर्माण झाला होता. चर्चमधील सीनमुळे वाद उफाळून आला होता. यामुळे ख्रिश्चन समुदायातील नागरिकांनी चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली होती. ठिकठिकाणी या समुदायाकडून निदर्शने करण्यात आली होती. रणदीप हुडा याच्याविरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

# 'डॉन ३' चित्रपटात झळकणार 'ही' मराठमोळी अभिनेत्री

'डॉन', 'डॉन २' चित्रपटाच्या यशानंतर 'डॉन ३' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. गेल्या वर्षभरापासून या चित्रपटाची चर्चा रंगली आहे. पण, फरहान अख्तरच्या बहुप्रतीक्षित 'डॉन ३' चित्रपटाचं चित्रीकरण सतत पुढे ढकललं जात आहे. या चित्रपटात रणवीर सिंह आणि कियारा अडवाणी एकत्र काम करणार होते. मात्र, कियाराचा 'डॉन ३' चित्रपटातून पत्ता कट झाल्याचं समोर आलं आहे. कियाराची जागा एक मराठमोळी अभिनेत्री घेणार आहे. लवकरच आई होणाऱ्या कियारा अडवाणीची 'डॉन ३' चित्रपटातून एक्झिट झाली आहे. त्यामुळे तिच्या जागी आलिया भट्टची को-स्टार, २०२४ बॉलीवूड गाजवणारी मराठी अभिनेत्रीची वर्णी लागली आहे. काही महिन्यांपूर्वी कियारा अडवाणीने लवकरच आई होणार असल्याची घोषणा केली होती. त्यामुळेच आपल्या वैयक्तिक आयुष्याला प्राधान्य देत कियाराने 'डॉन ३' चित्रपट सोडण्याचा निर्णय घेतल्याचं म्हटलं जात आहे. म्हणून निर्मात्यांनी कियाराच्या जागी माजी दिवंगत माजी मुख्यमंत्री मनोहर जोशीची नात म्हणजे अभिनेत्री शर्वरी वाघची निवड केली आहे. फरहान अख्तर दिग्दर्शित या चित्रपटासाठी शर्वरीचं नाव निश्चित झालं आहे. 'डॉन ३' चित्रपटाचं चित्रीकरण २०२५ च्या अखेरपर्यंत सुरू होऊ शकतं. या चित्रपटातील डॉनच्या भूमिकेसाठी रणवीर सिंह ठरला आहे पण, अजूनपर्यंत कास्टिंग संदर्भात अधिकृतरित्या निर्मात्यांनी भाष्य केलेलं नाही.




# अल्लू अर्जुनचा ॲटलीबरोबर नवीन चित्रपट

शाहरुख खानच्या 'जवान' चित्रपटाची सर्वत्र जोरदार चर्चा झाली. 'जवान'ने अनेक रेकॉर्ड्स मोडत बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी केली. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी दाक्षिणात्य दिग्दर्शक ॲटली कुमारने सांभाळली होती. २०१३ मध्ये ॲटलीने त्याच्या दिग्दर्शनाच्या कारकिर्दीची सुरुवात केली आणि केवळ चारच चित्रपट दिग्दर्शित केल्यानंतर त्याने शाहरुखबरोबर 'जवान' हा चित्रपट दिग्दर्शित केला. 'जवान'नंतर त्याचं नाव देशभरात पोहोचलं असून केवळ तमिळच नाही, तर आघाडीचा दिग्दर्शक म्हणून आता त्याचं नाव घेतलं जाऊ लागलं आहे. अशातच आता शाहरुख खाननंतर तो 'पुष्पा' फेम अल्लू अर्जुनबरोबर एक चित्रपट करत आहे, ज्याची गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला पडद्यामागील काही खास क्षण शेअर करत या चित्रपटाची घोषणा करण्यात आली. अशातच आता ॲटलीच्या अल्लू अर्जुनबरोबरच्या चित्रपटाबाबत एक बातमी समोर आली आहे, ती म्हणजे या चित्रपटासाठीचे एक खास फोटोशूट पार पडले. या चित्रपटासंबंधित लूक टेस्ट आणि फोटोशूट पार पडले. मुंबईतील मेहबूब स्टुडिओमध्ये लूक टेस्ट आणि फोटोशूट झाले. अल्लू अर्जुनच्या लूक टेस्टसाठी काही १२ वर्षांच्या मुलांनाही निवडण्यात आले आहे. अल्लू अर्जुनची लूक टेस्ट दुपारी १ वाजता सुरू झाली. अल्लू अर्जुनच्या व्यक्तिरेखेला लक्षात घेऊन वेगवेगळे लूक तयार करण्यात आले. खरंतर, अल्लू अर्जुनने 'पुष्पा'मुळे स्वतःची एक प्रतिमा निर्माण केली आहे. त्यामुळे ॲटली आता त्याला एका नवीन रुपात लोकांसमोर आणू शकतो. त्यामुळे आता अल्लू अर्जुनला नवीन रूपात पाहण्यासाठी त्याचे चाहतेही चांगलेच उत्सुक आहेत. ॲटली कुमारला आधी सलमान खानबरोबर काम करायचे होते; पण काही कारणास्तव ते शक्य झाले नाही. त्यामुळे सलमान यातून बाहेर पडला आणि तो बाहेर पडल्यानंतर, ॲटलीने अल्लू अर्जुनला चित्रपटात घेतले. ॲटलीने या चित्रपटाच्या कथेबद्दल काही माहिती दिलेली नाही. पण ॲटली आणि अल्लू अर्जुन यांना एकत्र पाहण्यासाठी अनेकजण उत्सुक आहेत.



# जावयासोबत ३८ वर्षांनंतर कमल हासन यांनी केला चित्रपट



भारतीय चित्रपट सृष्टीतील दिग्गज अभिनेते कमल हासन मोठ्या अंतरानंतर पुन्हा एकदा आपल्या जावयासोबत दिसणार आहेत. कमल हासन यांनी आपले अनुभव शेअर केले. यावेळी त्यांनी चित्रपटांच्या भविष्यावरही भाष्य केले. कमल हासन यांचे मोठे भाउ चारू हासन यांचे मणिरत्नम हे जावई आहेत. त्यांच्यासोबत काम करायला कमल हासन यांना तब्बल ३८ वर्षे लागली. दोघांचा या आधिचा चित्रपट 'नायकन' ने कमल हासन यांना सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार मिळवून दिला. आता पुन्हा एकदा हे दोघेही एकत्र येणार आहेत. त्यांचा आगामी 'ठग लाइफ' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. हा मणीरत्नम यांच्या सासरच्या निर्मिती कंपनी राज कमल फिल्म्स इंटरनॅशनलसाठीचा पहिला चित्रपट आहे. कमल हासन यांच्या 'एक दूजे के लिए' चित्रपटाने उत्तर भारतीय प्रेक्षकांना १९८१ साली भुरळ घातली. त्यांना आता दिग्दर्शक मणिरत्नममध्ये त्याचे दिग्दर्शक के. बालचंदर यांची प्रतिमा दिसते. के बालाचंदर यांना कमल हासन हे चित्रपट क्षेत्रातील आपले गुरू मानतात. 'नायकन' चित्रपटानंतर, मणिरत्नम यांनी 'ठग लाईफ' चित्रपटात कमल हासन यांचे दिग्दर्शन करण्यास सहमती दर्शविली आणि कमल हासन याचे संपूर्ण श्रेय त्यांचे मोठे भाऊ चारू हासन यांना देतात. कमल हासन म्हणतात, 'ठग लाईफ' हा चित्रपट मला अशा प्रकारचा चित्रपट पाहायचा आहे. मी स्वतःला भाग्यवान समजतो की मला त्याची निर्मिती आणि अभिनय करण्याची संधी मिळाली. चाहते अनेक वर्षांपासून मला विचारत आहेत की मी मणीसोबत पुढचा चित्रपट कधी करणार आहे. या विलंबाबद्दल आम्ही दिलगीर आहोत आणि एका प्रकारे, 'ठग लाईफ' हा चित्रपट आमच्या चाहत्यांना आमच्याकडून समेट घडवून आणण्याची ऑफर मानता येईल. दरम्यान, कमल हासन यांनीही सिनेमाच्या भविष्याबद्दल मोकळेपणाने बोलले. ते म्हणतात, सिनेमापेक्षा लोकशाही कला दुसरी कोणतीही नाही, पण लोक त्यांच्या प्रसिद्धी, समृद्धी आणि शंकांमध्ये इतके रमलेले असतात की ते याकडे लक्ष देत नाहीत.

# समांथाच्या आयुष्यात पुन्हा प्रेमाची एन्ट्री?

समांथा रुथ प्रभू ही सर्वात लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. दाक्षिणात्य इंडस्ट्रीसह तिनं आपलं नाव गाजवलं आहे. गेले काही दिवस ती आजारपणामुळे आणि वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत होती. समांथापासून घटस्फोट घेतल्यानंतर नाग चैतन्य याने अभिनेत्री शोभिता धुलिपालासोबत लग्नगाठ बांधली. तर दुसरीकडे समांथा मात्र एकटीच होती. मात्र, अशातच आता अभिनेत्री एका निर्माता आणि दिग्दर्शकाला डेट करत असल्याच्या चर्चा सुरू आहेत. नुकतंच समांथा मिस्त्री बॉयसोबत तिरुपती बालाजी मंदिरात पोहोचली. याचे काही फोटो आणि व्हिडीओ समोर आले आहेत. समांथानं तिरुपती बालाजी मंदिरात दर्शन घेतलं. यावेळी तिच्यासोबत चित्रपट निर्माते राज निदिमोरू होता. समोर आलेल्या व्हिडीओमध्ये समांथा आणि राज हे मंदिर परिसरात पारंपारिक पोशाखात दिसून आले. समांथा रूथ प्रभू आणि राज निदिमोरू यांच्यात गेल्या काही काळापासून डेटिंगच्या अफवा पसरत आहेत. मात्र, दोघांपैकी कोणीही या अफवांना दुजोरा किंवा नाकारलं नाही. विशेष म्हणजे समांथाच्या आयुष्यात एखादा साथिदार असावा अशी तिच्या चाहत्यांचीही इच्छा आहे. नागा चैतन्य आणि सामंथा रुथ प्रभू यांनी ऑक्टोबर २०२२ मध्ये वेगळे होण्याची घोषणा केली होती. समांथाच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास ती 'रक्त ब्रह्मांड'मध्ये पाहायला मिळणार आहे. याआधी समांथा 'सिटाडेल हनी बनी'मध्ये दिसली होती. ही वेब सीरिज राज यांनी दिग्दर्शित केली होती या सीरिजच्या शूटिंगपासून समंथा आणि राज यांच्यात डेटिंगच्या अफवा पसरत आहेत.



# महेश मांजरेकर यांना करायचंय 'या' अभिनेत्रीबरोबर सिनेमा




महेश मांजरेकर हे लोकप्रिय दिग्दर्शक व अभिनेते म्हणून प्रसिद्ध आहेत. नुकताच त्यांना व्ही. शांताराम जीवनगौरव हा पुरस्कार जाहीर झाला आहे. लवकरच, ते 'देवमाणूस' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. या चित्रपटात त्यांच्याबरोबर रेणुका शहाणेदेखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.

मांजरेकर व रेणुका शहाणे यांना एका मुलाखतीत त्यांना विचारण्यात आले की, तुम्हाला स्क्रीनवर आवडणाऱ्या जोड्या कोणत्या? त्यावर रेणुका शहाणे म्हणाल्या, मला अशोक सराफ व रंजना देशमुख यांची जोडी खूप आवडायची. शम्मी कपूर व राजश्री खूप आवडायचे. मला अमिताभ बच्चन व रेखा, तसेच जया बच्चन व संजीव कुमार यांची जोडी खूप आवडायची. महेश मांजरेकर म्हणाले, जया बच्चन व अमिताभ बच्चन यांची जोडी आवडायची. तसेच मला ऋषी कपूर व डिंपल या जोडीला स्क्रीनवर पाहायला आवडलं असतं. कोणत्या अभिनेत्रीबरोबर काम करायला आवडलं असतं, या प्रश्नाचं उत्तर देताना महेश मांजरेकर म्हणाले, मला तब्बूबरोबर काम करायला आवडलं असतं. त्याबरोबरच रेखाबरोबर काम करायला आवडलं असतं. पुढे महेश मांजरेकर म्हणाले, मला छाया कदमबरोबर काम करायला आवडेल. ती कमालीची अभिनेत्री आहे. तसेच महेश मांजरेकर व रेणुका शहाणे यांनी या चित्रपटात एकमेकांबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला. तसेच महेश मांजरेकर यांनी सलमान खान व शिवाजी साटम हे त्यांच्यासाठी देवमाणूस असल्याचे म्हटले. ही दोन्ही माणसं माझ्यासाठी कायम देवमाणसं राहतील, असे त्यांनी म्हटले. रेणुका शहाणे यांनी दुसऱ्या एका मुलाखतीत, 'देवमाणूस' चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये महेश मांजरेकर गुलाब केसात माळताना दिसत आहेत, त्या सीनचा किस्सा सांगितला. त्या म्हणाल्या, तो सीन उत्स्फूर्तपणे घडलेला आहे. महेशनं झेंडूचं फूल दिलं होतं, तर मी म्हटलं की, झेंडू कसा माळणार डोक्यात? मग त्या अनुषगांनं तेजसनं त्यात बदल करून तो सीन शूट केला. पती आशुतोष राणा यांनी कधी गुलाब दिलं आहे का? यावर बोलताना रेणुका शहाणे म्हणाल्या, राणा सर मला शाब्दिक गुलाब देतात. ते ज्या पद्धतीनं कौतुक करतात, त्यांच्या कविता या तर माझ्यासाठी गुलाबच आहेत.

# गश्मीर महाजनी 'या' सिनेमाच्या दुसऱ्या भागात दिसणार नाही

मराठी अभिनेता गश्मीर महाजनी नुकताच 'सुशीला सुजीत' या चित्रपटाच्या 'चिऊताई चिऊताई दार उघड' या गाण्यामधून प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या गाण्यात त्याच्याबरोबर अभिनेत्री अमृता खानविलकरदेखील दिसली होती. अभिनेता मराठीसह हिंदी मालिका, वेब सीरिज, रिॲलिटी शोमधूनदेखील प्रेक्षकांचे मनोरंजन करीत असतो. देऊळ बंद या चित्रपटातून अभिनेत्याच्या भूमिकेला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली आणि त्यामुळे त्याला मोठी प्रसिद्धी मिळाली होती. या चित्रपटात मोहन जोशी, निवेदिता सराफ, प्रवीण तरडे, महेश मांजरेकर असे अनेक दिग्गज कलाकार दिसले होते. आता या चित्रपटाचा दुसरा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मात्र, या चित्रपटाबाबत गश्मीर महाजनीने मोठा खुलासा केला आहे. गश्मीर महाजनीने नुकतीच 'लोकमत फिल्मी'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत गश्मीर म्हणाला की 'देऊळ बंद' सिनेमाच्या वेळीच दुसऱ्या सिनेमाची कथा लिहिली गेली होती. हा सिनेमा शेतकऱ्यांच्या विषयावर असल्यामुळे त्यात राघव शास्त्री हा नासाचा वैज्ञानिक फिट बसत नाही. म्हणून मी सिनेमात दिसणार नाही. मात्र, पहिल्या भागात दिसलेले इतर कलाकार दुसऱ्या भागातही दिसणार आहेत. देऊळ बंद हा चित्रपट २०१५ ला प्रदर्शित झाला होता. या सिनेमाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या सिनेमात गश्मीरने नासाचा वैज्ञानिक राघव शास्त्रीची भूमिका साकारली होती. प्रवीण तरडे यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. आता नुकतीच 'देऊळ बंद २'च्या शूटिंगला सुरुवात केली आहे. दरम्यान, गश्मीर महाजनी 'फुलवंती' या चित्रपटात प्रमुख भूमिकेत दिसला होता. या चित्रपटातील त्याच्या भूमिकेला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले. प्राजक्ता माळी या चित्रपटात प्रमुख भूमिकेत दिसली होती. त्यानंतर मृण्मयी देशपांडे व सुरभी भोसले या अभिनेत्रींबरोबर एक राधा एक मीरा या चित्रपटात प्रमुख भूमिकेत दिसला होता. तसेच इमली या हिंदी मालिकेतून त्याने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. खतरों के खिलाडी या रिॲलिटी शो मध्येदेखील सहभागी झाला होता. या शोमध्ये तो फर्स्ट रनरअप ठरला.



# 'बाई वाड्यावर या' ही निळू फुलेंची इमेज नाही !



लक्ष्मण मराठी सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकारांपैकी एक म्हणजे निळू फुले. अनेक सिनेमांत खलनायकाची तगडी भूमिका साकारुनही त्यांनी प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवलं. सिंहासन, पिंजरा, गाव तसं चांगलं पण वेशीला टांगलं, सामना, फटाकडी, प्रतिकार अशा अनेक सिनेमांमध्ये काम करून त्यांनी वर्षानुवर्षे प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. आपल्या वडिलांच्या पावलांवर पाऊल ठेवत निळू फुलेंची मुलगी गार्गी फुले यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. वेगवेगळ्या मालिकांमध्ये काम करुन त्यांनी आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली. सध्या गार्गी फुले एका कारणामुळे चर्चेत आल्या आहेत. दिवंगत अभिनेते निळू फुले यांचे अनेक डायलॉग फेमस आहेत. पण,नुकत्या 'बाई वाड्यावर या' असा डायलॉग त्यांनी कधीच कुठल्या चित्रपटात म्हटला नाही, असं मत त्यांची लेक गार्गी फुले यांनी मांडलं आहे. नुकतीच गार्गी फुले या 'वास्तव कट्टा' या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली. त्यादरम्यान, गार्गी फुले म्हणाल्या, बाबाच्या एकाही चित्रपटात त्यांनी हे म्हटलेलं नाही की, बाई वाड्यावर या! तुम्ही शोधून दाखवा. मी अनेकांना सांगते की प्लिज शोधून दाखवा मला. मीही शोधते. मी अनेक चित्रपट बघितले पण 'बाई बाड्यावर या' असं बाबा कुठेही म्हटलेला नाही.

मला बाबाची ती इमेज मोडायची आहे. पुढे त्यांनी म्हटलं,आता नवीन पिढीला जर निळू फुले कळावे असं वाटत असेल तर 'बाई वाड्यावर या' हीच इमेज त्याची नाही आहे. म्हणजे त्यांनी समाजकारण केलं आहे. समाजकार्य केलंय, यासाठी ते अनेक वर्ष लढले आहेत. चित्रपट सृष्टीमध्ये कामगारांसाठी जो लढा उभा राहिला तो मिथुन चक्रवर्ती आणि अशा काही लोकांनी केला आहे. या गोष्टी लोकांपर्यंत पोहोचत नाही. माझं असं म्हणणं आहे की, त्यांचं सामाजिक कार्य किती मोठं होतं हेही लोकांना माहिती असायला हवं. असं त्यांनी सांगितलं. दरम्यान, गार्गी फुले थत्ते यांनी देखील वडिलांचा अभिनयाचा वारसा पुढे चालवला. घरातूनच अभिनयाचं बाळकडू मिळालेल्या गार्गी या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत अभिनयात सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. त्यांनी 'तुला पाहते रे', 'राजा राणीची गं जोडी', 'शुभविवाह', 'सुंदरा मनामध्ये भरली' या मालिकांमध्ये काम केलं आहे. अलिकडेच त्या 'थोडं तुझं आणि थोडं माझं' मालिकेत झळकल्या.



# राणी मुखर्जीच्या 'मर्दानी-३' ची रिलीज डेट जाहीर

अभिनेत्री राणी मुखर्जीच्या 'मर्दानी ३' या चित्रपटाची मोठी अपडेट समोर आली आहे. २०१४ साली 'मर्दानी' चित्रपट प्रदर्शित झाला होता, ज्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता शिवानी शिवाजी रॉयच्या भूमिकेत राणी पुन्हा एकदा शत्रूंना धडा शिकवताना दिसणार आहे. यश राज फिल्म्सकडून 'मर्दानी ३'ची रिलीज डेटची जाहिर करण्यात आली आहे. यशराज फिल्म्सने त्यांच्या इन्स्टाग्राम हँडलवर चित्रपटाचे पोस्टर शेअर केले, ज्यामध्ये राणी मुखर्जीचा दमदार आणि धडाकेबाज अवतारातील शिवानी शिवाजी रॉय दिसत आहे. पोस्टरमध्ये ती हातात पिस्तूल घेऊन दिसत आहे. तिचा लूक अत्यंत प्रभावी आहे. पुढील वर्षी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी 'मर्दानी ३' प्रदर्शित होणार आहे. प्रोडक्शन हाऊसने कॅप्शनमध्ये लिहिले, मर्दानी ३ ची उलटी गिनती सुरू! होळीच्या सणाला चांगुलपणा दुष्टांशी लढेल, कारण शिवानी शिवाजी रॉय २७ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या पडद्यावर परत येत आहे. प्रदीप सरकार यांच्या दिग्दर्शनाखाली 'मर्दानी' हा चित्रपट २०१४ मध्ये प्रदर्शित झाला होता. 'मर्दानी २' चे दिग्दर्शन गोपी पुथरन यांनी केले होते, जो २०१९ मध्ये प्रदर्शित झाला. या दोन्ही चित्रपटांमध्ये राणी मुखर्जीला एक कठोर आणि धाडसी पोलीस अधिकारी म्हणून प्रेक्षकांनी खूप पसंत केले. 'मर्दानी ३' पटकथा लेखन आयुष गुप्ता यांनी केलं आहे. तर दिग्दर्शनाची धुरा अभिराज मीनावाला यांनी पार पाडली. चित्रपटाच्या दोन्ही भागांनी बॉक्स ऑफिसवर शानदार कामगिरी केली. दोन ब्लॉकबस्टर हिट दिल्यानंतर आता 'मर्दानी ३' बॉक्स ऑफिसवर नवे रेकॉर्ड रचण्यासाठी सज्ज होणार आहे.

# 'जेलर- २'मध्ये राम्या कृष्णन



दक्षिणेतील दिग्गज अभिनेत्री राम्या कृष्णन पुन्हा एकदा सुपरस्टार रजनीकांत यांच्यासोबत मोठ्या पडद्यावर स्वत:च्या अभिनयाची जादू दाखवून देण्यास तयार आहे. अलिकडेच तिने जेलर २ या चित्रपटाचे चित्रिकरण सुरू केले आहे. या बहुप्रतीक्षित चित्रपटाचे दिग्दर्शन नेल्सन दिलीप कुमार करत आहे. राम्याने इन्स्टाग्रामवर चित्रिकरणाच्या पहिल्या दिवसाची छायाचित्रे शेअर केली आहेत. पदयप्पाला २६ वर्षे आणि जेलर २ च्या चित्रिकरणाचा पहिला दिवस अशी कॅप्शन तिने दिली आहे. चित्रपटात राम्या ही रजनीकांत यांची व्यक्तिरेखा मुथुवेल पांडियनची पत्नी विजया पांडियनच्या भूमिकेत दिसून येणार आहे. जेलर २ चे चित्रिकरण सध्या केरळच्या अट्टापडीमध्ये सुरू आहे. चित्रिकरणासाठी रजनीकांत यापूर्वीच तेथे पोहोचले आहेत. या चित्रपटात अभिनेत्री मिरना देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहे.

सन पिक्चर्सच्या बॅनर अंतर्गत निर्माण होणाऱ्या या चित्रपटाचे चित्रिकरण सर्वप्रथम चेन्नईत सुरू झाले होते आणि आता हे केरळमधील सुंदर ठिकाणी पार पडत आहे. जेलर हा चित्रपट २०१३ मध्ये प्रदर्शित झाला होता आणि त्याने ३४८.५५ कोटी रुपयांची कमाई केली होती. यामुळे निर्मात्यांनी याचा सीक्वेल निर्माण करण्याची घोषणा केली होती.



# यामी गौतम आणि इमरान हाश्मी एकत्र

बॉलीवूड अभिनेत्री यामी गौतम एका नव्या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट १९८५ मध्ये सर्वोच्च न्यायालयात झालेल्या ऐतिहासिक शाह बानो विरुद्ध मोहम्मद अहमद खान खटल्यावर आधारित आहे. या खटल्याच्या ४० व्या वर्धापनदिनी या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे, ज्यामध्ये यामी गौतम मुख्य भूमिकेत दिसणार आहे. यामी या चित्रपटात एका दमदार महिलेच्या रूपात दिसणार आहे. वृत्तानुसार यामी गौतमच्या पतीच्या, म्हणजेच मोहम्मद अहमद खानच्या भूमिकेत इम्रान हाश्मी दिसणार आहे. या खटल्यात अहमद खानने आपल्या पत्नीला तिहेरी तलाक देऊन सोडले होते आणि नंतर निर्वाह भत्ता देण्यास नकार दिला होता. अहवालानुसार, चित्रपटाचे पहिले शूटिंग शेड्यूल पूर्ण झाले असून, हा चित्रपट १९७० च्या दशकाच्या पार्श्वभूमीवर सेट करण्यात आला आहे. इमरान हाश्मी यामीच्या पतीची भूमिका साकारत आहे, जो शाह बानोचा पती अहमद खानपासून प्रेरित आहे आणि प्रेक्षक या प्रकल्पातील प्रतिभावान कलाकारांकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा करू शकतात. यामी गौतमला नुकतेच 'आर्टिकल ३७०' चित्रपटात पाहिले गेले, ज्यामध्ये तिच्या अभिनयाचे समीक्षक आणि प्रेक्षकांनी कौतुक केले. दुसरीकडे, इम्रान हाश्मी सध्या आपल्या 'ग्राउंड जीरो' चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे, ज्यामध्ये तो बीएसएफ अधिकार्‍याच्या भूमिकेत दिसणार आहे. याशिवाय, तो सलमान खानच्या 'टायगर ३' मध्येही दिसला आहे. १९७८ मध्ये ६२ वर्षीय शाह बानो यांना त्यांच्या पतीने तिहेरी तलाक दिला होता. त्यानंतर त्यांनी निर्वाह भत्त्यासाठी न्यायालयात धाव घेतली. १९८५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल देताना सांगितले की, सीआरपीसीची कलम १२५ सर्व धर्मांवर समानपणे लागू होते. हा निकाल महिलांच्या हक्कांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला होता.



‘आओरी चमेली एक बात बतायें... तुम ना सुनो तो किसको सुनाये’ न्यू थिएटरच्या ‘इन्कलाब’ या १९३५ सालच्या स्वतःच्या पहिल्याच चित्रपटातील हे गाणे केदार शर्मा यांनी लिहिले व पडद्यावर अभिनितही केले. सहज सुलभ शब्दांची गाणी लिहिणारा गीतकार जेव्हा ‘सपना बन साजन आये’ हे १९५१ सालच्या ‘शोखीया’ चित्रपटासाठी आपली शब्दकळा काव्यात प्रकट करतो तेव्हा ही हरहुन्नरी व्यक्ती तीच असेल का, असा प्रश्न पडतो.

## हमारी याद आयेगी

# बहुआयामी: केदार शर्मा



हिंदी ‘सपना बन साजन आये। सोयी कलिया हंस पडी...’ केदार शर्माच्या लेखणीतून उतरलेल्या या गाण्याचा चित्रपट त्यांनीच दिग्दर्शित केला होता. लताने गायिलेल्या १० सर्वोत्कृष्ट गाण्यांमधील हे आहे. त्याच चित्रपटात सुरय्याने गायिलेले शर्माजीचे गाणे तिचे आयकॉनिक साँग ठरले. रातोंकी नींद छिन ली आँखोके इंतजारने सहमी हुयी कली हंसी कहने लगी हारकेकेवळ सात-आठ चित्रपटात संगीत देऊन आपली कारकीर्द आटोपती घेणारे महान संगीतकार जमाल सेन यांच्या स्मृतीला अभिवादन करून पुढे जाऊ...

भारतीय चित्रपटसृष्टीचा रजत पट १९३१ पासून बोलायला व गायला लागला. चित्रपटसृष्टीच्या बोलपटाच्या कारकीर्दीचे सिंहावलोकन केल्यास, स्मरण रंजनाच्या खेळात अनेक दार्शनिकांच्या योगदानाने आजचा सोनियाचा दिनू पाहावयास मिळाला, हे निश्चित पटेल. अशाच कलावंतांपैकी केदार शर्मा होते. निर्माता, निर्देशक, गीतकार, संवाद लेखक स्क्रिप्ट राईटर, अभिनेता अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे ते धनी होते. ते सिनेसृष्टीत आले तेव्हा रुपेरी पडदा नुकताच बोलू व गाऊ लागला होता. या कलासृष्टीला वैभवाच्या शिखरावर पोहोचविण्याच्या दृष्टीने अथक प्रयत्नांचे पहिले पाऊल उचलले ते शर्माजींनीच. न्यू थिएटरच्या ‘पुरण भगत’ चित्रपटाने प्रभावित होऊन शर्माजी कोलकात्याला आले. आधीच ओळखीचे असलेले पृथ्वीराज कपूर यांच्याकडे आले. पृथ्वीराज तंबोरा घेऊन गाण्याचा रियाझ करीत होते. त्यांनी शर्मांना कुंदनलाल सैगलांकडे पाठविले. सैगल व्यायाम व कसरत करण्यात मग्न होते. शर्मांनी विचारल्यावर सैगल म्हणाले की, चित्रपटात नायक होण्यासाठी केवळ गायकी असणे पुरेसे नाही; शरीर पण पिळदार असावे लागते. पृथ्वीराजकडे शरीर पिळदार होते, पण गायकी नव्हती तर सैगल गायक होते, पण शरीरयष्टी पिळदार नव्हती... सारे काही अजबच.

सैगलच्या मदतीने १९३५ साली न्यू थिएटर कंपनीत शर्मा पोस्टर पेंटर म्हणून रुजू झाले. त्या काळात इंग्रजीत ते एम.ए. होते. त्यांच्या साहित्यिक दर्जाने व कवित्वाने देवकी बोस प्रभावित झाले व शर्माजींना १९३५ सालच्या ‘इन्कलाब’ चित्रपटात काही गीते लिहिण्याचे काम व छोटा रोलही दिला. लेखाच्या प्रारंभीचे ‘आवोरी चमेली’ हे शर्माजींनी लिहिलेले पहिले गाणे होते. खर्या अर्थी १९३६ सालच्या ऐतिहासिक ख्यातिप्राप्त ‘देवदास’ या सैगल नायक असलेल्या चित्रपटात गीते, संवाद व लेखक म्हणून त्यांना संधी मिळाली. त्या काळात भारतभर ‘देवदास’ चित्रपटाने कीर्तिमान शाबीत केले; त्याचबरोबर केदार शर्मांनादेखील प्रसिद्धी मिळाली. १९४० साली सैगलने काम केलेल्या ‘जिंदगी’ चित्रपटातील ‘मै क्या जाणू क्या जादू है’ हे शर्माजीचे गाणे कोण विसरेल? १९४० साली न्यू थिएटर सोडून शर्माजी मुंबईस रणजित स्टुडिओज या कंपनीत मानाच्या हुद्यावर रुजू झाले. नंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. दिग्दर्शन क्षेत्रात मातब्बरी सिद्ध केली.

१९६४ साली शर्मांनी या चित्रपटाचा रिमेक केला. त्यात गीतकार साहिर व संगीत रोशनचे होते. दोन्ही वेळा ‘चित्रलेखा’ला भरपूर यश मिळाले. त्यांनी स्नेहल भाटकर, रोशन, जमाल सेन, हंसराज बहेल, बुलो सी राणी आदी संगीतकारांना चित्रपटात स्थान दिले. केदार शर्मा यांच्या १९५० सालच्या ‘बावरे नैन’ चित्रपटातील- सुनो बैरी बलम सच बोल इब क्या होगा मै खोयी तू खोने लगा हाँ, मेरे दिलमे यूं यूं होणे लगा हाँ... हे गाणे त्यांचेच होते, ज्याला संगीत दिले होते रोशन यांनी. या गाण्यात ‘इब’ शब्दाचा टोन इफेक्ट साधेपर्यंत राजकुमारी या गायिकेकडून पाच-सहा वेळा रिअर्सल करण्यात आल्या तसेच अंतर्यातील ‘हाँ’चा प्याचही त्यांनी टाकायला लावला. त्याच चित्रपटातील मुकेशने गायलेले ‘खयालो में किसी के इस तरह आया नही करते’ यातील अंतर्यात ‘दिलों को रोंधकर दिल’ या ऐवजी ‘दिलों को तोडकर’ म्हणता आले असते, पण शर्माजींनी ‘रोंधकर’ हा शब्द व पहिल्या गाण्यात ‘अब’च्या ऐवजी ‘इब’ शब्द वापरून परिणाम साधला. केदार शर्मा यांच्याच दिग्दर्शित केलेल्या व गीते लिहिलेल्या ‘हमारी याद आयेगी’ या चित्रपटात, त्यांच्या रसिल्या मनाचा व परफेक्शनचा अनुभव संगीतकार स्नेहल भाटकर यांना आला.

कभी तनहाईयो मे यूं हमारी याद आयेगी अंधेरे छा रहे होंगे की बिजली क्रोन्ध जायेगी ‘क्रोन्ध’ शब्दाचा वापर आवर्जून करून चित्रपटातील प्रसंगातील हवा तो परिणाम मुकेशच्या अनुनासिक स्वरातून साधला. नर्गिस व दिलीपकुमार या जोडीने शर्माजींच्या निर्देशनात अभिनयाची उंची गाठली. नर्गिस एका कार्यक्रमात म्हणाल्याचे वाचले आहे- ‘मदर इंडिया’त मी सर्वोत्तम काम केले तरीही ‘जोगन’मध्ये उत्तम अभिनय कसा करावा, हे केदार शर्मांकडून शिकले व पुढे फायदा झाला. दिग्गज अभिनेता राज कपूर यांनी म्हणाले होते की, केदार शर्मा ही एका व्यक्तीची संस्था आहे. मला स्वतःला निर्मिती दिग्दर्शन क्षेत्रातले सर्व ज्ञान त्यांनी दिले. केदार शर्मा हे असे रसायन होते. दिग्दर्शक, संगीतकार, गीतकार, गायक, अभिनेता इ. सर्व मिळून चित्रपटाच्या यशासाठी व रसिक प्रेक्षकांना कलेचा आस्वाद घ्यावा अशी मेहनत करीत. तेव्हाच अशी अजरामर गाणी व चित्रपट तयार होत.

आजही ६०-७० वर्षांनंतरही ती गाणी ऐकताना अवघ्या देहाचा कान होतो. हे सर्व डिव्हाईन होते. चार-पाच पिढ्यांचा नॉस्टेलजिया ठरण्याएवढे काय असते त्यात? अशांसाठी हे उत्तर आहे! केदार शर्मांसारखा बहुआयामी कलाकार, आदर्श व मूल्ये टिकविण्याच्या नादात, प्रसिद्धी व शो मॅन या गुणांशी समझोता न केल्यामुळे काही काळ मागे पडले व फिल्मी उद्योगात एकटे पडले. १२ एप्रिल १९१० रोजी तत्कालीन पंजाबमधील नरोवाल गावी या महानुभावाचा जन्म झाला. त्यांनी ३७ चित्रपट निर्देशित केलेत. ‘नेकी और बदी’ या चित्रपटात गीता बालीचे नायक म्हणूनही काम केले. भावपूर्ण व कथेला अनुसरून त्याच प्रकारचे संवाद असले की वास्तवता निर्माण होते. एकेका शब्दाचा वापर करताना ते दक्ष असायचे. त्यांचे चित्रपट, प्रकृतीतल्या वाईल्ड अँगल शॉटसाठी लक्षात राहतात. चिल्ड्रेन फिल्म सोसायटी त्यांनी नावारूपाला आणली.

१९८० सालचा ‘पहिला कदम’ हा चित्रपट त्यांच्या कारकीर्दीतला अखेरचा कदम ठरला. २९ एप्रिल १९९९ हा त्यांचा स्मृती दिन ठरला. यानिमित्त या थोर दार्शनिकाचे आदरयुक्त स्मरण व त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ लावलेली शब्दांची एक पणती! रमेश पोफळीवनात आनंदाची पखरण केली, हे मात्र खरे. (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

**रमेश पोफळी**

# आमिर बनवणार महाभारतावर चित्रपट




‘द परफेक्शनिस्ट’ अशी ओळख असणारा बॉलीवूड अभिनेता आमिर खान नेहमी वैविध्यपूर्ण कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येत असतो. ‘दंगल’, ‘लगान’, ‘पीके’, ‘तारे जमीन पर’ यांसारख्या अनेक उत्तमोत्तम कलाकृतींमध्ये आमिर खानने काम करीत प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आमिर खान शेवटचा ‘लालसिंग चड्ढा’ या चित्रपटात पाहायला मिळाला होता. हा ‘फॉरेस्ट गंप’ या हॉलीवूड चित्रपटाचा रिमेक होता. त्यानंतर अद्याप आमिर खान दुसऱ्या कोणत्याही चित्रपटात पाहायला मिळाला नाही. अशातच आता आमिर खान लवकरच एक भव्य कलाकृती घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

आमिर खान महाभारतावर आधारित एक नवीन चित्रपट बनवणार असल्याचं त्यानं म्हटलं आहे. आमिरने म्हटले आहे, लवकरच ‘महाभारत’ या चित्रपटाचं काम सुरू करणार आहे. चित्रपटाची निर्मिती मी स्वत: करणार असून, या वर्षी चित्रपटाचं काम सुरू होईल. पण सुरुवातीचा बराच काळ चित्रपटाच्या लिखाणासाठी जाईल. याबाबत बोलताना त्याने सांगितले की, या चित्रपटाचे ‘लॉर्ड ऑफ द रिंग्ज’ या हॉलीवूड सीरिजप्रमाणे अनेक भाग बनविण्यात येतील. या चित्रपटाचं लिखाण पूर्ण होण्यासाठी बराच मोठा काळ जाईल. पुढे तो म्हणाला, या चित्रपटात मी असेन की नाही हे अद्याप सांगू शकत नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी कास्टिंग टीमची आहे. त्यामुळे आम्ही कलाकारांची निवड करताना कोण कोणत्या भूमिकेसाठी योग्य आहे हे पाहूनच त्यांची निवड करू. मला वाटत नाही की, महाभारत एका भागातून सांगितलं जाऊ शकतं. म्हणून आम्ही या चित्रपटाचे अनेक भाग करण्याचा विचार करीत आहोत. इतक्यात सांगता येणार नाही; पण त्यासाठी आम्हाला इतर दिग्दर्शकांची गरज भासू शकते. त्यामुळे आता बॉलीवूडमध्ये बऱ्याच काळानंतर एक पौराणिक चित्रपट प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. दरम्यान, आमिर लवकरच ‘सितारे जमीन पर’ या चित्रपटात झळकणार आहे. विशेष म्हणजे त्यामध्ये अभिनेत्री जिनिलिया देशमुखही महत्त्वाच्या भूमिकेत असणार आहे. हा चित्रपट २००७ साली आलेल्या ‘तारे जमीन पर’चा दुसरा भाग आहे. येत्या २० जून २०२५ रोजी तो प्रदर्शित होणार आहे.



# माधुरी आणि तृप्ती पुन्हा दिसणार एकत्र

अभिनेत्री माधुरी दीक्षित आणि तृप्ती डिमरी यांनी अनीस बज्मी यांच्या 'भूल भुलैया ३' चित्रपटात एकत्र काम केले होते. आता तृप्ती आणि माधुरी पुन्हा एकदा एकत्र पाहायला मिळणार आहेत. सुरेश त्रिवेणी यांच्या दिग्दर्शनाखालील एका कॉमेडी ड्रामामध्ये दोघी एकत्र काम करण्यासाठी सज्ज होणार आहेत. माधुरी दीक्षित आणि तृप्ती डिमरी विक्रम मल्होत्राच्या प्रॉडक्शन बॅनर अबुंडंशिया एंटरटेनमेंटसाठी एका कॉमेडी ड्रामामध्ये स्क्रीन शेअर करणार आहेत, ज्याचे नाव सध्या 'माँ बेहन' असल्याचे म्हटले जात आहे. तसेच तो नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. पुढील महिन्यात मुंबईत त्याचे शूटिंग सुरू होणार असल्याचे देखील म्हंटले जात आहे. हा चित्रपट एक कॉमेडी-ड्रामा आहे, जो तीन पात्रांवर आधारित आहे, ज्यामध्ये माधुरी दीक्षित आणि तृप्ती डिमरी या कथेत आई-मुलगी म्हणून दिसणार आहेत. कलाकारांमध्ये रवि किशन आणि धारणा दुर्गा यांचाही समावेश आहे. तर या चित्रपटासाठी मुख्य अभिनेत्याचा शोध अजूनही सुरू आहे. तृप्ती डिमरीबद्दल बोलायचे झाले तर, ती विशाल भारद्वाज यांच्या आगामी चित्रपट 'अर्जुन उस्तरा'मध्ये शाहिद कपूरसोबत दिसणार आहे. मात्र, ती 'आशिकी ३' मधून बाहेर पडली आहे, परंतु तिला सतत मोठ्या चित्रपटांच्या ऑफर मिळत आहेत.





# 'गुस्ताख इश्क'मध्ये फातिमा

विजय वर्मा आणि फातिमा सना शेखचा आगामी चित्रपट 'उल जलूल इश्क'चे नाव बदलण्यात आले आहे. फॅशन आयकॉन मनीष मल्होत्राकडून निर्मित या रोमँटिक ड्रामाचे नाव 'गुस्ताख इश्क' ठेवण्यात आले आहे. मनीष मल्होत्राने इन्स्टाग्रामवर ही माहिती शेअर केली आहे. तसेच त्याने एक नवे पोस्टर जारी केले असून यात विजय आणि फातिमा परस्परांच्या मिठीत असल्याचे दिसून येते. पोस्टरमध्ये विजय आणि फातिमा यांच्यातील केमिस्ट्री दाखविण्यात आली आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने विजय आणि फातिमा ही नवी जोडी प्रेक्षकांना पाहता येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विभु पुरी करणार आहेत. त्यांनी यापूर्वी हवाईजादा या चित्रपटाचे दिग्दर्शन केले हेते. तर नव्या चित्रपटाची देखील विभु पुरी यांनीच लिहिली आहे. तर या चित्रपटासाठी गुलजार आणि विशाल भारद्वाज हे एकत्र आले आहेत. गुलजार यांच्या गीताना विशाल भारद्वाज संगीत देणार आहेत. या चित्रपटात नसीरुद्दीन शाह हे दिग्गज कलाकारही दिसून येणार आहेत.

# 'कांतारा'चा प्रीक्वल होणार लवकरच रिलीज

दाक्षिणात्य अभिनेता आणि दिग्दर्शक ऋषभ शेट्टीचा 'कंतारा' हा चित्रपट २०२२ मध्ये प्रदर्शित झाला होता. कांतारा प्रदर्शित झाल्यानंतर बॉक्स ऑफिसवर हिट ठरला होता. या चित्रपटाची देशभरात मोठी क्रेझ पाहायला मिळाली. आता प्रेक्षक या चित्रपटाच्या प्रीक्वलची आतुरतेने वाट पाहत असतानाचा चित्रपटाची नवी रिलीज डेट समोर आली आहे. या चित्रपटाचा प्रीक्वल 'कांतारा चॅप्टर-१'ची रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे. हा चित्रपट यावर्षी २ ऑक्टोबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटावर ऋषिक शेट्टी आणि त्याच्या टीमने प्रचंड मेहनत घेऊन कांतारासारखी कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला आणली होती. २०२३ मध्ये, कांताराचा प्रीक्वल येणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. अखेर कांतारा चॅप्टर -१ रिलीज डेट जाहीर झाली आहे. आम्ही खूप आनंदी आहोत आणि प्रेक्षकांचे आभारी आहोत, ज्यांनी कांताराला प्रचंड प्रेम आणि पाठिंबा दिला. मला ही संधी कांताराच्या प्रीक्वलची घोषणा करण्याची मिळाली आहे. तुम्ही जे पाहिले ते खरे तर भाग २ आहे, भाग १ हा या वर्षी प्रदर्शित होणार असल्याचे ऋषभने सांगितले आहे. ऋषभ शेट्टीचा कांतारा हा चित्रपट २०२२ मध्ये रिलीज झाला होता. या चित्रपटाला प्रेक्षकांनी प्रेम दिले. सर्वाधिक पाहिल्या गेलेल्या चित्रपटांपैकी कांताराचा समावेश होता. या चित्रपटाने जगभरात ४०० कोटींची कमाई केली होती. आता कांतारा चॅप्टर १ ऑक्टोबरमध्ये रिलीज होणार आहे.